**रे.मु.नं.४३८/२०१० निशाणी क्र.१६० खालील आदेश**

**(बबन मनोहर तांबे विरुध्द ईश्वर गोविंद तांबे व इतर)**

प्रतिवादी क्र. २ याने प्रस्तुतचा अर्ज हा पुराव्याचे प्रतिज्ञापत्र देण्याकामी व त्यांच्याविरूद्ध झालेला आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. २ यांचे कथन की, वादी यांनी प्रस्तुत दावा हा वाटपासाठी, जाहिर ठरावासाठी व मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यात प्रतिवादी क्र. २ हे हजर होवून कैफियत दाखल केली आहे. परंतु प्रतिवादी हा अडाणी असल्यामुळे तारखेबाबतच्या गैरसमजुतीमुळे व इतर केसेस व दावे चालू असल्यामुळे मे. न्यायालयात पुराव्याचे ॲफिडेव्हीट देणे गरजेचे होते परंतु सदरचे ॲफिडेव्हीट देणे राहून गेले आहे. दावा हा युक्तीवादासाठी प्रलंबित आहे. प्रतिवादी यांच्या कैफियतीनुसार कायदेशीर मागणी आहे. तसेच त्यांना न्यायहक्काची बाजू मांडायची आहे. असे असताना प्रतिवादी हा गैरहजर असल्याने दावा हा युक्तीवादाकामी नेमलेला आहे. प्रतिवादीला पुराव्याचे प्रतिज्ञापत्र देणे आहे. प्रतिवादी यांस संधी न मिळाल्यास त्याचे कधीही न भरून येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे तरी प्रतिवादी यांनी पुरावा देण्याची परवानगी मिळावी, अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जास आक्षेप घेतला असून नि. १६३ अन्वये म्हणणे दाखल केले आहे. वादीचे कथन की, प्रतिवादी क्र. २ हा दाव्यात हजर होवून त्याने कैफियत दाखल केली आहे. तसेच प्रतिवादी क्र. २ याने प्रस्तुत दाव्यात दि. ०७/०१/२०१७ रोजी पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.९७ दाखल केले असून वादीतर्फे उलटतपास घेण्यात आलेला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. २ याने त्याच्यातर्फे साक्षीदार भाऊसाहेब राजाराम लोखंडे यांच्या पुराव्याचे प्रतिज्ञाप्रत्र दाखल केले असून त्याचा देखील उलटतपास वादीतर्फे घेण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. २ हा वेळोवेळी दाव्यात तसेच तारखेला न्यायालयात हजर झालेला आहे. केवळ दाव्याचे कामकाज लांबवण्याच्या हेतूने प्रस्तुतचा बेकायदेशीर स्वरूपाचा अर्ज दाखल केला आहे म्हणून अर्ज हा खर्चासह रद्द करावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज वाचला दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल केलेल्या

दस्तऐवजाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुत दावा हा वाटपासाठी, जाहिर ठरावासाठी व मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. २ दाव्यात हजर होवून कैफियत दाखल केली असून, नि. ९७ अन्वये पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दि. ०७/०१/२०१७ रोजी दाखल केले आहे. तसेच प्रतिवादी क्र.२ तर्फे साक्षीदाराचे प्रतिज्ञापत्र नि. १०३ दि. २४/०९/२०१७ रोजी दाखल केले असून सदर साक्षीदारांचा वादीतर्फे उलटतपास घेण्यात आलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ ते ९ सतत गैरहजर असल्यामुळे पूर्वपिठासीन अधिकारी यांनी दि. १५/०२/२०१८ रोजी पुरावा बंद केल्याचा आदेश पारीत करण्यात आला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १४ यांनी न्यायालयात नि. ११४ अन्वये पुरावा दाखल केला असून दोन साक्षीदार तपासण्यात आले आहेत. सदर साक्षीदारांचा व प्रतिवादी क्र. १४ यांचा वादीतर्फे उलटतपास घेण्यात आलेला असून प्रतिवादी क्र. १४ यांनी दि. २२/०३/२०२४ रोजी पुरावा बंद केला आहे व त्यानंतर मूळ दावा हा युक्तीवादासाठी प्रलंबित आहे. अर्जाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. २ यांचा पुरावा झालेला असून सतत गैरहजरीमुळे त्यांचा पुरावा हा न्यायालयाने बंद केला आहे. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी क्र. २ यांनी पुन्हा पुरावा देण्याची परवानगी मिळावी म्हणून विनंती केली आहे. दि. २४/०७/२०१७ ते १५/०२/२०१८ व त्यानंतर प्रतिवादी क्र. १४ यांचा पुरावा संपेपावेतो प्रतिवादी यांनी पुढील पुरावा का देवू शकले नाही, याबाबतचा सविस्तर पुरावा अर्जात नमुद केलेला नाही. तसेच प्रस्तुत अर्जासोबत कुठलेही प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही. मूळ दावा हा १० वर्ष जुना असून युक्तीवादासाठी प्रलंबित आहे. प्रतिवादी यांनी कोणतेही संयुक्तिक कारण अर्जात नमुद केले नाही. म्हणून अर्ज प्रथमदर्शनी नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** अर्ज नि. १६० नामंजूर करण्यात येतो.

PANKAJ HILAL PATIL

Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2026.03.10 10:48:06 +0530

राहुरी

( **श्री. पी. एच. पाटील** )

दि. ०९/०३/२०२६

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, राहुरी